वर्ष-०७ | अंक-४३ | मुंबई, मंगळवार १४ ते २० सप्टेंबर २०२१ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक

PG 2 मैत्रिणीच्या सांगण्यावरून मित्रांनी घातला दरोडा; वृद्ध महिला डॉक्टरला लुटणाऱ्या पाच जणांना अटक

3 → साकीनाका प्रकरणी तपासात कुठलाही हलगर्जीपणा नसल्याबद्दल राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे समाधान

नालासोपारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत शरीरास हानिकारक असलेल्या गुटखा पानमसाला याचा मोठा साठा पकडला ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## मुंबईत सात महिन्यांत बलात्काराचे 550 गुन्हे



मुंबई : टाळेबंदी शिथिल होऊ लागताच महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढल्याचे दिसत आहे. यंदा जानेवारी ते जुलै या सात महिन्यांच्या कालावधीत मुंबईत बलात्काराचे ५५० गुन्हे दाखल झाले आहेत. तर विनयभंगाचे सुमारे ११०० गुन्ह्यांची नोंद झाली. मुंबई पोलिसांच्या आकडेवारीतून हे स्पष्ट झाले आहे. साकीनाका भागात महिलेवर अमानुष अत्याचार केल्याच्या घटनेने मुंबईसह संपूर्ण राज्य सुन्न झाले. अमानुषपणे महिलेवर लैंगिक अत्याचार ...पान २ वर...

# साकीनाका बलात्कार प्रकरणात ATROCITY ACT अंतर्गत गुन्हा दाखल:हेमंत नगराळे

साकीनाका बलात्कार प्रकरणात मुंबई पोलिस आयुक्तांनी आज पत्रकार घेत या प्रकरणत अॅट्रोसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केल्याची माहिती आज सोमवारी दिली. या घटनेतील पीडीत महिला ही विशिष्ट समाजाची असल्याने एससी एसटी एक्ट या गुन्ह्याअंतर्गत लावण्यात आला आहे, असे मुंबई पोलिस आयुक्त हेमंत नगराळे यांनी स्पष्ट केले. या संपुर्ण प्रकरणात तपास सुरू असून आरोपीला २१ तारखेपर्यंत पोलिस कस्टडी दिली आहे. सोशल मिडियावर गैरसमज पसर



वणाऱ्या पोस्ट व्हायरल होत आहेत. म्हणूनच फॅक्च्युअल गोष्टी समोर आणण्यासाठी पत्रकार परिषद घेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. साकीनाका बलात्कार प्रकरणात आरोपीने आपला गुन्हा कबुल केला आहे. या संपुर्ण घटनेचा क्राईम सीन निर्माण करण्यात आला आहे. या संपुर्ण गुन्ह्याचे डिजिटल स्वरूपातील पुरावेही गोळा करण्यात आल्याचे नगराळे यांनी सांगितले. घटनास्थळावर पीडीत महिला कधी, त्याठिकाणी आरोपी कधी आला, गुन्हा कला घडला, आरोपी घटना स्थळावरून कसा गेला ? यासा ठीचा पुरावा मिळाला आहे. तसेच या गुन्ह्यातील प्रमुख हत्यारही जप्त केले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या गुन्ह्यासाठी अत्यंत अनुभवी अशा वकीलांची नेमणूक करण्यात आली आहे. अत्यंत संवेदनशील गुन्हा असल्याने विशेष वकीलांची नेमणूक या प्रकरणी केली आहे. अॅड राजा ठाकरे या क्रिमिनल लॉयरची नेमणूक या गुन्ह्यासाठी केली आहे. संपुर्ण प्रकरणातील तपासातही तेदेखील मार्गदर्शन करत आहे. गुन्ह्याची चार्जशीट एक महिन्याच्या आत दाखल करणार आहोत. पण ...पान २ वर...

## पीडितेच्या कुटुंबियांसाठी सरकारकडून 20 लाखांची मदत जाहीर

गणेशोत्सवाच्या वातावरणात मुंबईला सुन्न करणारी घटना गेल्या आठवड्यात साकीनाका परिसरात घडली. एका ३४ वर्षीय महिलेवर टेम्पोचालकाने अमानुष लैंगिक अत्याचार केले. या महिलेचा उपचारांदरम्यान मृत्यू झाला. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. अंधेरी साकीनाका परिसरात राहणारा आरोपी मोहन चौहान याने पीडितेवर केलेल्या लैंगिक अत्याचारांमुळे संपूर्ण देशभरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. यासंदर्भात मुंबईचे पोलीस आयुक्त हेमंत नगराळे यांनी दुसऱ्यांदा पत्रकार परिषद घेत या प्रकरणातील तपासाबाबत माहिती दिली आहे. "पीडित महिला ही विशिष्ट समाजाची असल्याने अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने तपास सुरु आहे. आरोपीने आपला गुन्हा कबुल केला आहे आणि त्याने गुन्हाच्या संपूर्ण घटनाक्रम सांगितला आहे. घटनास्थळावर गुन्हा कसा घडला या घटनाक्रमातून सर्व पुरावे मिळाले आहेत. आरोपीकडून गुन्हासाठी वापरण्यात आलेलं ...पान २ वर...

## मुंबई पुन्हा हादरली ! जावयानं दगडाने सासूचं गुप्तांग ठेचून केली हत्या



मुंबई, महाराष्ट्राची राजधानी मुंबईत नेमकं काय सुरू आहे? असाच प्रश्न अनेकांना पडला आहे. मुंबईतील साकीनाका येथे एका तरुणीवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या केल्याची घटना ताजी असताना, महिलेवर क्रूरतेचा कळस गाठणारी आणखी एक घटना समोर आली आहे. मुंबईतील विले पार्ले परिसरात एका जावयानं आपल्या सासूची भयंकर पद्धतीनं हत्या केली आहे. या क्रूर घटनेनं पुन्हा एकदा राजधानी हादरली आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून असून आरोपी जावयाला बेड्या ठोकल्या आहेत. नेमकी घटना काय आहे? हत्या करणारा आरोपी तरुण हा विलेपार्ले परीसरातील रहिवासी आहे. काही दिवसांपूर्वी त्याला पोलिसांनी चोरीच्या आरोपाखाली अटक केली होती. या प्रकरणात तो 1 सप्टेंबर रोजी जामिनावर सुटून तुरुंगाबाहेर आला. दरम्यान त्याच्या पत्नीनं दुसरं लग्न केल्याचं त्याला समजलं. एवढच नव्हे तर त्याच्या पत्नी दुसऱ्या नवऱ्यापासून गरोदर आहे, हे कळल्यावर त्याचा पारा चढला. याच ...पान २ वर...

## पोलीस पतीच्या जाचाला कंटाळून 7 महिन्याच्या गर्भवती महिलेची आत्महत्या



बीड, पोलीस दलातील पतीच्या सतत मारहाणीच्या जाचास कंटाळून 7 महिन्याच्या गर्भवतीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील दरडवाडी येथे घडली आहे. एकीकडे गौरीचं आगमन झालं आहे, ऐन या उत्सवाच्या काळात माहेरी आलेल्या महिलेनं आत्महत्या केल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्योती गोविंद जाधवर असं मयत महिलेचं नाव आहे. तिच्या पोटात 7 महिन्याचे बाळ होते. केज तालुक्यातील दरडवाडी येथील ज्योतीचा पाच वर्षांपूर्वी विवाह सोलापूर जिल्ह्यातील उक्कडगाव येथील गोविंद जाधवर या पोलीस दलात नोकरी करणाऱ्या तरुणा सोबत झाले होते. लग्नावेळी 15 लाख रुपये हुंडा दिला. मात्र ट्रॅक्टर घेण्यासाठी आणखी पैसे घेऊन ये, या ...पान २ वर...

## पुण्यातील बिल्डरकडे खंडणीची मागणी, शेतकऱ्यासह दोन मुलांना अटक



पिंपरी चिंचवड : एका बांधकाम व्यावसायिकाकडे एक लाख रुपयांची खंडणी मागितल्याच्या आरोपाखाली पिंपरी चिंचवड पोलिसांनी 46 वर्षीय शेतकरी आणि त्याच्या दोन मुलांना रविवारी अटक केली. तिघे आरोपी आपल्याला गेल्या पाच महिन्यांपासून त्रास देत असल्याचे बिल्डरने आपल्या तक्रारीत म्हटले होते. आपल्या दोन कंत्राटदारांकडून त्यांनी 75 हजार रुपये उकळल्याचा दावाही बिल्डरने केला होता. संशयित सत्यवान तापकीर आणि त्यांची मुलं आकाश (25) आणि सागर (23) यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे, अशी माहिती दिघी पोलिस उपनिरीक्षक सुनील भदाणे यांनी दिली. टाईम्स ऑफ इंडिया वृत्तपत्राने यासंदर्भात बातमी दिली आहे. काय आहे प्रकरण? " ...पान ४ वर...

## पोलीस शिपायाने पक्ष्याची शिकार केल्याचा संशय

मुंबई : शिकारीला आळा घालण्यासाठी वनविभाग प्रयत्नशील असताना पोलिसांच्या गणवेशातील एका व्यक्तीने पक्ष्याची शिकार केल्याचे छायाचित्र समाजमाध्यमांवर प्रसारित झाले आहे. पाणथळ जागांवरील पक्षी, जंगलांमधील प्राणी, इत्यादी वन्यजीवांना विविध कायद्यांतर्गत संरक्षित करून त्यांची शिकार हा कायदेशीर गुन्हा आहे. प्राण्यांच्या शिकारीबाबत समाजमाध्यमांवर काही माहिती प्रसारित होत असल्यास त्यावर 'अम्मा के अर फाऊंडेशन पॉज मुंबई' या संस्थेचे सदस्य लक्ष ठेवून



असतात. एका व्यक्तीचे छायाचित्र संस्थेच्या सदस्यांना आढळले. या व्यक्तीच्या एका हातात बंदूक तर दुसऱ्या हातात एक पक्षी आहे. त्याच व्यक्तीची पोलीस गणवेशातील दोन छायाचित्रेही प्रसारित झाली आहेत. छायाचित्रांसोबत त्या व्यक्तीचे नाव आणि ही व्यक्ती शिरकी-पेण येथे प्राण्यांची शिकार करत असल्याचे मजकूर आहे. छायाचित्रात दिसत असलेला पक्षी हा पाणथळ जमिनीवर आढळणारा आहे. या प्रकाराबाबत मानद वन्यजीव रक्षक सुनीष सुब्रमण्यम् यांनी ...पान ४ वर...

## ठाण्यात मोबाईलचोरांनी रिक्षातून खेचून तरुणाला फरफटत नेले



ठाणे, ठाणे शहर पोलिस आयुक्तालय हद्दीत चोरांनी खूपच हौदोस घातला असून रिक्षातून घरी जाणाऱ्या एका तरुणाचा मोबाइल दुचाकीवरील चोरांनी खेचण्याचा प्रयत्न केला. परंतु तरुणाने हातातील मोबाइल न सोडल्याने चोरांनी या तरुणालाच धावत्या रिक्षातून बाहेर खेचल्याचा धक्कादायक प्रकार भिवंडीतील भादवड नाका येथे घडला आहे. रिक्षातून खाली पडलेल्या तरुणाला चोर फरफटत घेऊन गेले. शिवाय तरुणाचा मोबाइलही चोरांनी लांबवला असून या संपूर्ण प्रकारामध्ये तरुणाच्या पाठीला गंभीर दुखापत झाली आहे. मोबाइल विक्रीचा व्यवसाय करणारा महेंद्र केसराम कुमार हा २५ वर्षांचा तरुण भिवंडीतील टेमघर परिसरात राहतो. बुधवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास तो रिक्षातून घरी ...पान २ वर...

## फोन टॅपिंगला मंजुरी देणारी कागदपत्रे सादर करण्याचे आदेश द्या

### आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला यांची मागणी

मुंबई : दलाल आणि राजकारण्यांचे फोनवरील संभाषण ध्वनिमुद्रित करण्यासाठी वेळोवेळी परवानगी मागितली असून गृह विभागाचे तत्कालीन अतिरिक्त मुख्य सचिव सीताराम कुंटे यांनी दिलेली मंजुरीची कागदपत्रे सादर करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी वरिष्ठ पोलीस अधिकारी रश्मी शुक्ला यांनी उच्च न्यायालयात केली आहे. पोलिसांच्या नियुक्त्या-बदल्यांमधील कथित भ्रष्टचार



आणि दिशाभूल करून फोनवरील संभाषण ध्वनिमुद्रित (फोन टॅपिंग) करण्यासाठी परवानगी घेतल्याचा कुंटे यांच्या दाव्याचे रश्मी शुक्ला यांनी प्रतिज्ञापत्राद्वरे खंडन केले. गोपनीय आणि संवेदनशील माहिती उघड के ल्याप्रकरणी मुंबई पोलिसांच्या सायबर विभागाने दाखल के लेला गुन्हा रद्द करण्याच्या मागणीसाठी शुक्ला यांनी उच्च न्यायालयात याचिका के ली आहे. त्यावर पोलिसांनी दाखल केलेल्या ...पान २ वर...

## अतिरिक्त भरपाई मंजूर करणाऱ्यांवर कारवाई करणार का?



मुंबई : राज्यात राष्ट्रपती राजवटीच्या काळात २०१९ च्या अखेरीस रस्ते कंत्राटदाराला १८४ कोटी रुपयांच्या ऐवजी ३५८ कोटी रुपयांची भरपाई मंजूर करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर राज्य सरकार कारवाई करणार आहे का? अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. 'मनाज टोलवेज' या रस्ते कंत्राटदाराला राष्ट्रपती राजवटीच्या काळात आधी मंजूर केलेल्या रकमेपेक्षा अतिरिक्त मोबदला मंजूर केल्या प्रकरणात राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे. त्यावरील सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाने ही विचारणा केली. मनाज टोलवेज ...पान २ वर...

## सचिन वाझे वोकहार्ट रुग्णालयात दाखल, ओपन हार्ट सर्जरी होणार

मुंबई : उद्योगपती मुकेश अंबानी यांचे निवासस्थान अँटिलियाबाहेर सापडलेले स्फोटक प्रकरण आणि मनसुख हिरेन हत्या प्रकरणी अटकेत असलेला निलंबित पोलीस निरीक्षक सचिन वाझे याची ओपन हार्ट सर्जरी होणार आहे. कोर्टाच्या परवानगीनंतर वाझे वोकहार्ट रुग्णालयात दाखल झाला आहे, अशी माहिती त्याच्या वकिलांनी दिली. वाझेच्या हृदय शस्त्रक्रियेची गरज जेजे रुग्णालयातील डॉक्टरांनी व्यक्त केल्याचा दावा, वाझेच्या वकिलांनी याआधी कोर्टात केला होता. दरम्यान, सचिन वाझेने मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाबाहेर स्फोटकांनी भरलेली गाडी का ठेवली, याचं उत्तर अखेर मिळालं आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणा (NIA) ने कोर्टात तब्बल दहा हजार पानांची चार्जशीट दाखल केली आहे. यामध्ये सचिन वाझेने स्फोटकांची गाडी का ठेवली, त्याची



कारणं मिळाली आहेत. सचिन वाझेला आपली जुनी ओळख परत मिळवायची होती. स्फोटकांनी भरलेल्या कारचा तपास करुन, उत्तम तपास अधिकारी म्हणून पुन्हा लौकिक मिळेल, अशी आशा सचिन वाझेला होती, मात्र इथेच तो फसला आणि जेलमध्ये गेला.

सचिन वाझे हा ख्वाजा युनूस एन्काउंटर प्रकरणात निलंबित झाला होता. मात्र ठाकरे सरकार सत्तेत आल्यानंतर 2020 मध्ये तो परत पोलीस दलात दाखल झाला. वाझेला थेट क्राईम इन्वेस्टीगेशन युनिट अर्थात CIU चे प्रमुख पद मिळालं. नव्वदच्या दशकातील 'एन्काऊंटर स्पेशलिस्ट' अशी ख्याती असलेला सचिन वाझे जवळपास 16 वर्षांनंतर 2020 मध्ये पोलिस दलात परतला होता. मात्र मनसुख हिरेन हत्या प्रकरणात आरोप झाल्यानंतर, त्याला पोलीस सेवेतून बडतर्फ करण्यात आलं.

मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाबाहेर 24 फेब्रुवारी 2021 च्या रात्री ...पान २ वर...

# मैत्रिणीच्या सांगण्यावरुन मित्रांनी घातला दरोडा; वृद्ध महिला डॉक्टरला लुटणाऱ्या पाच जणांना अटक



सांगलीतील विश्रामबाग परिसरात राहणाऱ्या प्रसिद्ध डॉक्टर नलिनी नाडकर्णी यांच्या घरात घुसून चाकू गळ्याला लावू दरोडा टाकल्याची घटना सात दिवसांपूर्वी घडली होती. या प्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे. अटकेतील पाच जणांकडून ५ लाख ९७ हजारांचे दागिने, ३७ हजारांचा मोबाईल, ८ हजार रुपये रोख असा एकूण ७ लाख ४२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अमित चंद्रकांत पाचोरे (वय २८, रा. नांद्रे), सचिन शिवाजी फोंडे (वय २७, रा. नांद्रे), रोहित देवगोंडा पाटील (वय २३, रा. वसगडे), निखिल राजाराम पाटील (वय ३१, रा. खटाव, ता. पलूस) आणि पायल युवराज पाटील (वय ३१, रा. सांगली) अशी अटक केलेल्या संशयितांची नावं आहेत. पायल पाचोरे ही डॉ. नाडकर्णी यांच्या ओळखीची होती. पायल आणि तिचा मित्र निखिल यांनीच कट रचून दरोड्याचा गुन्हा घडवून आणल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, ५ सप्टेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास डॉ. नलिनी नाडकर्णी घरामध्ये एकटया असताना तिघांनी त्यांच्या घरात प्रवेश केला. त्यांच्या गळयाला धारदार कोयता लावून जीवे मारण्याची धमकी देत २५ तोळे सोने व रोख रक्कम लुटली होती. गुन्हा घडलेल्या ठिकाणी कोणताही पुरावा मिळू नये यासाठी आरोपींनी सर्व पुरावे नष्ट केले होते. त्यामुळे या प्रकरणी तपास करणे पोलिसांपुढे आव्हान होते. विश्रामबाग पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक अमितकुमार पाटील हे तपास करत असताना त्यांना माहिती मिळाली की, नलिनी नाडकर्णी यांच्या ओळखीची पायल पाटील होती. नाडकर्णी यांच्या घरी त्यांचे सारखे येणे-जाणे होते. पायल पाटील हिने तिचा मित्र निखिल पाटील याच्या सोबत कट रचून घरात दरोडा टाकण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी पाचोरे, फोंडे आणि रोहित पाटील यांची मदत घेतली. त्यावरून नांद्रे, वसगडे, खटाव आणि सांगली येथे छापा टाकून पाच जणांना अटक केली. पाच जणांकडे पोलिसांनी कसून चौकशी केल्यानंतर सर्वांनी मैत्रिणीच्या सांगण्यावरून गुन्हा केल्याची कबुली दिली. या पाचही जणांकडून पोलिसांनी चोरीतील सोन्याचे दागिने, रोख रक्कम, गुन्हा करण्यासाठी वापरलेले ५ मोबाईल, ४ मोटारसायकली व एक कोयता असा एकूण ७ लाख ४२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक कल्लाप्पा पुजारी, सहायक पोलीस निरीक्षक अमितकुमार पाटील, पोलीस फौजदार अनिल ऐनापुरे, आदिनाथ माने, दरिबा बंडगर, अक्षय ताटे, आदींनी केली.

## पीडितेच्या कुटुंबियांसाठी सरकारकडून

पृष्ठ १ वरुन

हत्यार सुद्धा जप्त करण्यात आलं आहे," असे हेमंत नगराळे यांनी सांगितलं. "राष्ट्रीय महिला आयोगाच्या अधिकाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली आहे. सोमवारी मुख्यमंत्री आणि इतर अधिकाऱ्यांसोबत वर्षा निवासस्थानी बैठक झाली. मुख्यमंत्र्यांनी पीडित महिलेच्या कुटुंबियांसाठी शासकीय योजना लागू केल्या आहेत. मुख्यमंत्री निधीतून आणि शासकीय योजनांमधून पीडितेच्या मुलींना २० लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे," असे पोलीस आयुक्त हेमंत नगराळे यांनी सांगितले. दरम्यान, साकीनाका येथे महिलेवर बलात्कार होऊन त्यानंतर तिच्या झालेल्या मृत्यू प्रकरणी पोलिसांनी सुरु केलेल्या तपासावर राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने समाधान व्यक्त केलं. राज्य शासन याप्रकरणी संपूर्ण न्याय देईल असा विश्वास व्यक्त करताना आयोगाचे उपाध्यक्ष अरुण हलदार यांनी या घटनेत राजकारण आणता कामा नये असे देखील स्पष्ट केले. मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे उपाध्यक्ष अरुण हलदार यांना या घटनेच्या अनुषंगाने स्वत: चर्चेसाठी बोलावून या घटनेकडे राज्य शासन गांभिर्याने पहात असून पीडितेच्या कुटूंबास योग्य तो मोबदला देण्यात येवून तिच्या मुलांच्या पालन पोषणाची जबाबदारी देखील पार पाडण्यात येईल असे आयोगास सांगितले.

## पोलीस शिपायाने पक्ष्याची

वनविभागाला पत्र लिहिले आहे. 'छायाचित्रातील पोलीस शिपायाचा शोध लागलेला नाही. तो नायगाव पोलीस ठाण्यात असल्यास हे प्रकरण ठाणे वनविभागाकडे दिले जाईल', असे उपवनसंरक्षक आशिष ठाकरे यांनी सांगितले. 'छायाचित्रातील पोलीस शिपाई सापडल्यानंतर त्यास चौकशीसाठी बोलावले जाईल. घटना नेमकी कु ठे घडली हे चौकशी अंती स्पष्ट होईल', असे वनपरिक्षेत्र अधिकारी कु लदीप पाटकर यांनी सांगितले.

## अतिरिक्त भरपाई मंजूर करणाऱ्यांवर

या कंत्राटदार कंपनीला मागील सरकारच्या काळात १८४ कोटी रुपयांचा मोबदला देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. मात्र २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झाली. या काळात मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी १८४ कोटी रुपयांऐवजी ३५८ कोटी रुपयांचा मोबदला मंजूर करण्याचा प्रस्ताव तयार करून त्यास मंजुरी घेतली होती. यामुळे राज्य सरकारचे नुकसान झाले आहे, असा युक्तिवाद महाराष्ट्र सरकारतर्फे अ‍ॅड. परमजीतसिंग पटवालिया यांनी केला. या नुकसानीस कारणीभूत असणाऱ्या अधिकाऱ्यांवर राज्य सरकारने काय कारवाई केली होती का, याची माहिती द्यावी. या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे काय? अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केली.

# एकतर्फी प्रेमातून शिवीगाळ, पोलिसात तक्रार केल्याने चाकूहल्ला, 20 वर्षीय तरुणीचा मृत्यू



चंद्रपूर : चंद्रपूर शहरातील महाकाली मंदिर परिसरातील चाकू हल्ला झालेल्या 20 वर्षीय तरुणीचा अखेर मृत्यू झाला. नागपूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये उपचारा दरम्यान आज सकाळी तिचा मृत्यू झाला. एकतर्फी प्रेमातून शिवीगाळ केल्यानंतर पोलिसात तक्रार केल्याने 27 वर्षीय तरुणीने तिच्यावर हल्ला केल्याचा आरोप आहे. गुरुवार म्हणजेच 9 सप्टेंबर रोजी संध्याकाळी एका 27 वर्षीय तरुणाने 20 वर्षीय मुलीवर चाकूहल्ला केला होता. या हल्ल्यात ती गंभीर जखमी झाली होती. त्यानंतर रक्तबंबाळ अवस्थेत मुलीला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. ऐन सणांच्या काळात गजबजलेल्या भागात झालेल्या घटनेने खळबळ उडाली आहे.

काय आहे प्रकरण?

चंद्रपूर शहरातील अतिशय वर्दळीच्या महाकाली मंदिर मार्गावर 9 सप्टेंबर रोजी प्रफुल्ल आत्राम या 27 वर्षीय तरुणाने मुलीवर चाकूहल्ला केला होता. पोलिसांनी आरोपी प्रफुल्ल आत्राम याला अटक करुन त्याच्यावर गुन्हा दाखल केला. विशेष म्हणजे या मार्गावर असलेल्या एका दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात घटनेनंतर पळताना आरोपी कैद झाला होता.

तरुणी-आरोपीची 2019 पासून एकमेकांशी ओळख

पोलिसांनी दिलेल्या माहितीप्रमाणे या प्रकरणातील पीडित तरुणी आणि आरोपी एकाच भागात राहणारे असून त्यांची 2019 पासून एकमेकांशी ओळख होती. आरोपीचे पीडित मुलीवर एकतर्फी प्रेम होते आणि यातून त्यांच्यात खटके उडायचे.

तरुणीला आरोपीची शिवीगाळ

पीडित तरुणी ज्या खाजगी रुग्णालयात काम करायची त्या रुग्णालयात आरोपीने 1 सप्टेंबरला जाऊन त्या मुलीला शिवीगाळ केली होती आणि याबाबत रामनगर पोलीस स्टेशनला गुन्हा देखील नोंदवण्यात आला होता. याच रागातून ही तरुणी रुग्णालयातून घरी जात असताना आरोपीने तिच्यावर चाकू हल्ला केला होता.

एकतर्फी प्रेमातून भीषण हत्याकांड

एकतर्फी प्रेमातून महाराष्ट्रात घडलेल्या भीषण हत्येच्या घटनांची आठवण काढताना उल्हासनगरची रिंकू पाटील, सांगलीची अमृता देशपांडे ही नावं प्रामुख्याने समोर येतात. उल्हासनगरमध्ये रिंकू पाटील (Rinku Patil) नावाच्या किशोरवयीन तरुणीची एकतर्फी प्रेमातून हत्या करण्यात आली होती. 30 मार्च 1990 रोजी घडलेल्या या घटनेच्या वाईट स्मृती जवळपास 31 वर्षांनंतरही अनेक जणांच्या मनात कायम आहेत. रिंकू पाटीलला उल्हासनगरमध्ये दहावीच्या परीक्षा केंद्रातच पेट्रोल टाकून जिवंत जाळण्यात आलं होतं.

यवतमाळमध्ये युवतीची एकतर्फी प्रेमातून हत्या

दुसरीकडे, यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यात राहणाऱ्या युवतीची एकतर्फी प्रेमातून हत्या करण्यात आल्याचा प्रकार काही महिन्यांपूर्वी समोर आला होता. खंडाळा पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत असलेल्या रामपूर नगर भागात सुवर्णा अर्जुन चव्हाण ही 21 वर्षीय युवती सहकुटुंब राहत होती. गावात राहणारा 25 वर्षीय आरोपी आकाश श्रीराम आडे याचे सुवर्णावर एकतर्फी प्रेम होते. सुवर्णाचे वडील, आई, भाऊ बाहेरगावी गेले होते. ही संधी साधून आरोपी आकाश तिच्या घरात शिरला. सुवर्णाच्या पोटात आकाशने चाकू आणि गुप्तीने वार केले. गंभीर जखमी झाल्यामुळे सुवर्णाला प्राण गमवावे लागले

## पुण्यातील बिल्डरकडे खंडणीची मागणी,

तिघे आरोपी बांधकाम व्यावसायिकाला त्यांच्याकडूनच सर्व साहित्य खरेदी करण्यास भाग पाडत होते. जेव्हा तक्रारदाराने त्यांना नकार दिला, तेव्हा त्यांनी त्याच्या ठेकेदारांना धमकी दिली आणि त्यांच्याकडून 75,000 रुपये घेतले" असेही भदाणे म्हणाले. त्यानंतर आरोपींनी तक्रारदाराकडे एक लाख रुपयांची मागणी केली आणि त्याच्या वाहनांची तोडफोड करण्याची धमकी दिल्याचाही आरोप आहे. ठाण्यात पैशांच्या हव्यासापायी मालकाचीच निर्घृण हत्या दुसरीकडे, पैशांच्या हव्यासापायी मालकाचीच निर्घृण हत्या करुन त्याला घराजवळ पुरल्याची धक्कादायक घटना ठाणे जिल्ह्यात समोर आली आहे. विशेष म्हणजे हत्या केल्यानंतर आरोपींनी खंडणीची मागणी केल्याचंही उघडकीस आलं आहे. ठाण्याचे व्यावसायिक हणमंत शेळके हे 1 सप्टेंबरला बेपत्ता झाल्याची माहिती समोर आली होती. त्यांच्या कुटुंबियांनी 1 सप्टेंबरला कासारवडवली पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. पोलिसांनी तातडीने तपासाला सुरुवात केली होती. या दरम्यान आरोपींनी शेळके यांच्या कुटुंबियांना फोन करत खंडणीची मागणी केली. शेळके यांच्या कुटुंबियांनी पोलिसांना याबाबतची माहिती दिली. विशेष म्हणजे आरोपी हे शेळके यांच्याच मोबाईलवरुन फोन करत होते. त्यामुळे त्यांचा शोध लागणं कठीण झालं होतं. पण आरोपींचा जेव्हा दुसऱ्यांदा फोन आला तेव्हा पोलीस सतर्क झाले. त्यांनी तांत्रिक आधारावर तपास करत तीन आरोपींना बेड्या ठोकल्या. त्यानंतर आरोपींनी सर्व गुन्हा कबूल करत पोलिसांना आपल्या कृत्यांची माहिती दिली. अपहरण करत त्याच दिवशी शेळके यांची हत्या पोलिसांनी केलेल्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली होती. आरोपींनी मृत हणमंत शेळके यांचं अपहरण केलं. त्याच दिवशी त्यांनी शेळके यांची अमानुषपणे हत्या केली. आरोपींनी शेळके यांचं मृत शरीर खोलीच्या मागेच चार फूट खोल खड्ड्यात मोकळया जागेत पुरलं. त्यानंतर शेळके यांच्याच मोबाईलवरुन फोन करत खंडणीची मागणी केली. घाबरेल्ल्या कुटुंबियांनी पोलिसांना हा सगळा प्रकार सांगितला. आरोपी शेळके यांच्याकडे मजुरीचे काम करायचे पोलिसांनी मोबाईल ट्रेस करुन आठ दिवसात आरोपींचा छडा लावला. हे सर्व आरोपी परप्रांतीय आहेत. त्यांच्यातील तिघेजण पळून गेले आहेत. तर आरोपी शिवा वर्मा आणि सुरज वर्मा हे पोलिसांच्या हाती लागले आहेत. ते हेमंत शेळके यांच्याकडे मजुरीचे कामं करत होते. पैशांच्या हव्यासापायी त्यांनी शेळके यांचे अपहरण करुन हत्या केली.

## सचिन वाझे वोकहार्ट रुग्णालयात दाखल

स्फोटकांनी भरलेली स्कॉर्पिओ उभी करण्यात आली होती. ही गाडी सचिन वाझेचा मित्र मनसुख हिरेन यांचीच होती. मनसुख हिरेन मृत्यू प्रकरण नेमकं काय? मुकेश अंबानी यांच्या घराबाहेर 24 फेब्रुवारी 2021 च्या रात्री स्फोटकांनी भरलेली स्कॉर्पिओ कार आढळली होती. ती स्कॉर्पिओ मनसुख हिरेन यांची होती. मात्र मनसुख हिरेन यांचा मृतदेह 5 मार्च 2021 रोजी मुंब्रा रेतीबंदर भागात सापडला होता. ही हत्या असल्याचा दावा करत NIA ने सचिन वाझे याला अटक केली. सध्या तो कोठडीत आहे. मनसुख हिरेन यांची हत्या घडली त्या रात्री नेमकं काय घडलं, याचे पुरावे पोलिसांच्या हाती लागले. त्या रात्री आरोपींनी हिरेन यांच्या नाकावर जबरदस्ती क्लोरोफॉर्म टाकलं. त्यामुळे हिरेन तात्काळ बेशुद्ध पडले. त्यानंतर आरोपींनी त्यांची हत्या केल्याचं सूत्रांनी सांगितलं. पोस्टमार्टमच्या रिपोर्टनुसार हत्येपूर्वी हिरेन यांच्या चेहऱ्यावर मार लागलेला होता. त्यांच्या चेहऱ्याच्या डाव्या बाजूला मार लागलेला होता. मृत्यूपूर्वी हा मार लागलेला होता. तसेच त्यांच्या अंगावर काही ठिकाणी मार होता. विशेषत: डोक्यालाही मार लागलेला होता, असं सूत्रांनी सांगितलं.

## पृष्ठ १ वरुन

### साकीनाका बलात्कार प्रकरणात

मुख्यत्वेकरून कालावधी जाणार आहे तो डीएनएचे रिपोर्ट येण्यासाठी कालावधी लागू शकतो असेही नगराळे यांनी स्पष्ट केले आहे. पुढच्या १५ दिवसांमध्ये तपास पूर्ण होऊ शकतो, असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला. दिल्लीतून राष्ट्रीय महिला आयोगाच्या सदस्या चंद्रमुखी देवी यांनी घटना स्थळाला भेट दिली आहे. तसेच तपास आणि वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांशी चर्चा केली आहे. त्यासोबतच राष्ट्रीय अनुसुचित जाती आयोगाचे उपाध्यक्ष अरूण हल्दर यांची आज दीड वाजता मुख्यमंत्री, गृहमंत्री हलदार आणि मुख्य सचिव, अप्पर मुख्य सचिव गृह, डीजी, सोशल, महिला बाल कल्याणच्या अतिरिक्त सचिव यांची सह्याद्रीवर बैठक झाली. त्यांनी पोलिसांनी कारवाई, तपास केला आहे याबाबत मुख्यमंत्र्यांसमोर पोलिसांचे कौतुक केले आहे. ज्या विविध शासकीय मदत योजना आहेत त्याचा लाभ पिडीतेच्या कुटूंबीयांना देण्यात येणार आहे. पीडीत महिलेच्या कुटूंबीयांसाठी एकुण २० लाखांची मदत करण्यात येईल. या पीडीत महिलेच्या तीन मुलींना कालांतराने सगळी प्रक्रिया पार पाडत ही मदत करण्यात येणार आहे. आणखी शासकीय योजनांमध्ये जितकी मदत करता येईल तितकी मदत करण्यात येईल असेही नगराळे यांनी स्पष्ट केले.

### पोलीस पतीच्या जाचाला कंटाळून 7

मागणीसाठी पती गोविंद वारंवार ज्योतीला मारहाण करत होता दोन दिवसांपूर्वी ज्योतीला पतीने मारहाण करून रात्री तीनच्या सुमारास माहेरी दरडवाडी येथे सोडून गोविंद जाधवर हा गावी परत गेला होता. रविवारी मुलीने घरातील वडील भाऊ आई व इतर सदस्य शेतात गेल्याचे औचित्य साधून घरामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. धक्कादायक म्हणजे, ज्योती या गर्भवती होत्या. पोटामध्ये सात महिन्याचे बाळ देखील होते. गेल्या 3 वर्षांमध्ये पती, सासू, सासऱ्यासह दिराचा सतत जाच सुरू होता. रात्रीच्या तीन वाजता मुलीच्या पतीने मुलीला माहेरी सोडले, मुलीला सतत मारत असे घरातील सासू सासरे, दीर देखील सतत जाच करत असत, असं मृत ज्योतीचा भाऊ बबन दराडे यांनी सांगितलं. ज्योतीचा पती हा उस्मानाबाद पोलीस दलामध्ये कार्यरत असून कायद्यामध्ये काम करणाऱ्या रक्षकाने पत्नीला जाच केला. त्यामुळे आत्महत्या झाली असा आरोप परिवारातील सदस्य करत आहेत. या घटनेमुळे संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी केज ग्रामीण पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### मुंबई पुन्हा हादरली!

रागातून आरोपीनं थेट सासूचं घर गाठून तिची निर्घृण हत्या केली आहे. आरोपी जावई सासूच्या घरी गेला असता, त्याचं सासूसोबत जोरदार भांडण झालं. बायकोचं दुसरं लग्न लावून दिल्याच्या रागात आरोपीनं सासूला जबरी मारहाण केली. आरोपी जावई एवढ्यावरच थांबला नाही, तर त्यानं दगड आणि चाकूनं सासूच्या गुप्तांगावर वार करत गुप्तांग दगडानं ठेचलं आहे. या माणुसकीला हादरवणाऱ्या घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. या घटनेची माहिती मिळताच विलेपार्ले पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. वपोलिसांनी जखमी महिलेला जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं. पण उपचार सुरू असताना पीडित महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. संबंधित आरोपी 1 सप्टेंबर रोजी जामिनावर सुटून बाहेर आला होता. यानंतर त्यानं 2 सप्टेंबर सासूची क्रूरतेनं मारहाण केली होती. यानंतर आता संबंधित जखमी महिलेनं रुग्णालयात उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला आहे. या घटनेचा पुढील तपास विलेपार्ले पोलीस करत आहेत.

### मुंबईत सात महिन्यांत बलात्काराचे 550 गुन्हे

करण्यात आले. या घटनेत पीडितेचा मृत्यू झाला. या घटनेने महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. टाळेबंदी शिथिल होऊन वर्दळ वाढू लागताच महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होऊ लागल्याचे दिसत आहे. गेल्या वर्षी जानेवारी ते जुलै या महिन्यादरम्यान मुंबईत बलात्काराच्या ३७७ घटना घडल्या होत्या. त्यातील २९९ घटनांमध्ये आरोपींना अटक करण्यात आली. यंदा गुन्ह्यांच्या प्रमाणात वाढ झाली असून मुंबईत बलात्काराचे ५५० गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. यातील ४४५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. विनयभंगाचे गुन्हेही वाढले आहेत. गेल्या वर्षी पहिल्या सात महिन्यांत विनयभंगाचे ९८५ गुन्हे दाखल करण्यात आले होते. यंदा ११०० गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. यामध्ये अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटनांचाही समावेश आहे. २०२० मध्ये पूर्ण वर्षात मुंबईत बलात्काराच्या ७६७ घटना घडल्या, तर विनयभंगाचे १९४५ गुन्हे दाखल झाले होते. हुंडाबळीच्याही घटना हुंडाबळीचे प्रकार कमी झाले असले तरी पूर्णत: बंद झालेले नाहीत. मुंबईत हुंडाबळीच्या ८ घटना घडल्या असून हुंड्यासाठी केलेल्या छळाप्रकरणी ३९७ महिलांनी तक्रार दाखल केली आहे. मुलींचे प्रमाण अधिक अल्पवयीन मुली अत्याचारांना अधिक बळी पडत असल्याचे आकडेवारीवरून दिसत आहे. मुंबईत या वर्षी सात महिन्यांमध्ये झालेल्या बलात्काराच्या घटनांमध्ये ३२३ अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यात आले, तर २२७ प्रौढ महिलांवर बलात्कार झाले. पोक्सो कायद्यांतर्गत विनयभंगाचे ७ महिन्यांत २४३ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

### फोन टॅपिंगला मंजुरी देणारी

गुन्ह्यात शुक्ला यांच्या नावाचा समावेश नसल्याने त्या गुन्हा रद्द करण्याची मागणी करू शकत नाहीत. परंतु गुन्हा रद्द करण्याची मागणी करून शुक्ला यांनी परवानगीविना फोन टॅपिंग के ल्याचेच उघड होत असल्याचा दावा राज्य सरकारने प्रतिज्ञापत्राद्वारे केला होता. राज्य सरकारच्या प्रतिज्ञापत्रावर शुक्ला यांनी नुकतेच प्रतिउत्तर दाखल केले. त्यात त्यांनी फोन टॅपिंगबाबतचा २६ ऑगस्ट २०२० रोजी सादर केलेला अहवाल मागे घेत असल्याचे आपण कधीही म्हटलेले नाही. शुक्ला यांचा दावा काय? राज्य सरकार कुंटे यांनी सादर केलेल्या अहवालावर अवलंबून आहे. या अहवालानुसार २७ जून ते १ सप्टेंबर २०२० या कालावधीत पोलिसांच्या बदल्या झाल्याच नाहीत. त्यामुळे शुक्ला यांच्या अहवालावर कारवाई करण्याची आवश्यकता नसल्याचे म्हटले होते. परंतु राज्य सरकार असा दावा करून न्यायालयासमोर चुकीचे चित्र निर्माण करत आहे. उलट आपण अहवाल सादर के ल्यानंतर ठरल्यानुसार बदल्या झाल्या होत्या. गोपनीय माहिती उघड केल्याच्या चौकशीतूनच राजकारणी आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी गंभीर गुन्हा करत असल्याचेच उघड होते. त्यामुळे गोपनीय माहिती उघड केल्याप्रकरणी गुन्ह्याचा तपास हा प्रामाणिक प्रयत्न आहे की आपल्यासारख्या नीडरपणे कर्तव्य बजावत असलेल्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा प्रयत्न आहे याची सीबीआयने चौकशी करण्याची गरज आहे.

### ठाण्यात मोबाईलचोरांनी

निघाला होता. भादवड नाका येथून जात असताना पाठीमागून दुचाकीवरून आलेल्या दोघांपैकी दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या चोराने महेंद्रच्या हातातील मोबाइल खेचण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याने हातातील मोबाइल काही सोडला नाही. त्यामुळे चोराने महेंद्रचा हात पकडून त्याला रिक्षातून बाहेर खेचले. जमिनीवर पडूनही त्याने हातातील मोबाइल न सोडल्याने चोर महेंद्रला जमिनीवरूनच खेचत घेऊन गेल्याने त्याच्या पाठीला जबर दुखापत झाली आहे. अखेर चोर या तरुणाच्या हातातील मोबाइल घेऊन पळून गेले. मोबाइलची किंमत १२ हजार ५०० रुपये आहे. या प्रकरणी रात्री उशिरा दोन चोरांविरुद्ध शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी २० ते २२ वर्ष वयोगटातील असून शांतीनगर पोलिसांनी तत्काळ आरोपींचा शोध सुरू केला. या प्रकरणात दोघांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडे चौकशी करण्यात येत असल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. दरम्यान, तीन महिन्यांपूर्वी ठाण्यात रिक्षातून जाणाऱ्या एका तरुणीच्या हातातील चोरट्यांनी मोबाइल खेचल्यानंतर ही तरुणी धावत्या रिक्षातून तोल जाऊन रस्त्यावर पडली. या प्रकारामध्ये गंभीर जखमी झालेल्या या तरुणीचा मृत्यू झाला होता.

पोलीस बातमी पत्र



मुंबई, मंगळवार १४ ते २० सप्टेंबर २०२१

संपादकीय...



## कैदी हा आधी माणूसच

एकोणिसाव्या शतकातील प्रसिद्ध अमेरिकन लेखक आणि इतिहासकार एडवर्ड एव्हरेट हॅले यांचे एक वाक्य, मनुष्याने साध्य केलेली प्रगती आणि विकासाच्या गमजा करणाऱ्या मानवजातीला अंतर्मुख होण्यास भाग पाडते. परक्याचे स्वागत करण्यात, भुकेल्याला अन्न भरविण्यास, नग्नाला कपडे पुरविण्यास आणि कैद्यांची काळजी घेण्यात जर आपण कमी पडत असू, तर ख्रिस्त जन्मानंतरच्या एकोणीस शतकात आम्ही काहीच साध्य केले नाही, हा त्यांच्या त्या वाक्याचा आशय! हॅले यांच्या त्या वाक्याचे स्मरण होण्याचे कारण म्हणजे मुंबई उच्च न्यायालयाचा ताजा आदेश! हॅले यांचे निधन होऊनही दोन शतकांपेक्षा अधिक काळ उलटून गेला आहे. तरीदेखील हॅले यांनी ज्या परिस्थितीकडे अंगुलीनिर्देश केला होता, ती दुर्दैवाने कायमच असल्याचे उच्च न्यायालयाच्या टिप्पणीवरून अधोरेखित होते. कर्करोगाशी झुंजत असलेल्या माओवादी नेत्या निर्मला उप्पुगंती ऊर्फ नर्मदा आक्का यांना मनःशांतीसाठी तुरुंगातून हलविण्याचा आदेश देताना, कैदी असला तरी तो मनुष्यच असतो, अशी टिप्पणी न्यायालयाने केली. नर्मदा आक्का यांच्यावर २०१९मध्ये गडचिरोलीत झालेल्या स्फोटात हात असल्याचा आरोप आहे. नर्मदा आक्का यांना चौथ्या टप्प्याचा कर्करोग असून, इतरही काही आजारांनी त्या ग्रस्त आहेत. त्यामुळे त्यांची प्रकृती अत्यवस्थ झाली आहे. सरकारने त्यांना किमो थेरपी घेण्याची संधी दिली नाही. शिवाय त्यांना कैद्यांची गर्दी असलेल्या कोठडीत ठेवले असून, तिथे त्यांना जमिनीवरच झोपावे लागते. त्यांना स्नानासाठी गरम पाणी, स्वच्छतागृह आदी मूलभूत सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात योग्य देखभाल व्हावी, यासाठी मुक्तता करण्याची विनंती नर्मदा आक्का यांनी न्यायालयाला केली होती. त्यांच्या अर्जावर निकाल देताना, न्यायालयाने शासन आणि प्रशासनाच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातले. राज्यघटनेच्या कलम २१ अन्वये प्रत्येक नागरिकाला, मग तो कच्चा वा पक्का कैदी का असेना, जीवनाचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. असे असताना एखाद्या कैद्याला वैद्यकीय उपचार नाकारणे याचा अर्थ, त्याला जीवन जगण्याचा घटनाप्रदत्त अधिकार नाकारणे, असाच होतो! नर्मदा आक्का यांचा आजार तर अशा स्तराला पोहोचला आहे की, वैद्यकीय उपचारांनी त्या ठीक होणे अशक्यप्राय आहे. उपचारांनी केवळ त्यांच्या वेदना कमी केल्या जाऊ शकतात. या परिस्थितीतही त्यांना तुरुंगातून हलविण्यास विरोध करण्याच्या सरकारच्या कृतीची कोणत्या शब्दांत निंदा करावी, हेच कळत नाही. शासनाच्या असंवेदनशीलतेचे हे एकमेव उदाहरण नव्हे! काही दिवसांपूर्वीच भीमा-कोरेगावप्रकरणी अटकेत असलेल्या स्टॅन स्वामी यांच्या संदर्भातही शासनाने अशीच भूमिका घेतली होती. ८४ वर्षे वयाचे स्टॅन स्वामी यांनी त्यांना पार्किन्सन हा असाध्य आजार असल्याचे कारण देत, जामिनासाठी अनेकदा अर्ज केला; परंतु प्रत्येकवेळी शासनाच्या विरोधामुळे तो फेटाळण्यात आला. शेवटी तर पार्किन्सनमुळे हातात प्याला धरणे अशक्य झाल्याच्या कारणास्तव किमान स्ट्रॉ तरी मिळावा, असा विनंती अर्ज त्यांनी विशेष न्यायालयात केला होता. एवढी साधी विनंतीही माणुसकीशून्य प्रशासनाने पूर्ण केली नाही. अखेर न्यायालयाच्या आदेशावरून त्यांना एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. शेवटी त्या रुग्णालयातच त्यांची प्राणज्योत मालवली. एकीकडे नर्मदा आक्का, स्टॅन स्वामी यांच्यासारखी अनेक उदाहरणे असताना, दुसरीकडे साध्या नगरसेवकालादेखील गंभीर गुन्ह्यात अटक होऊनही खोट्यानाट्या आजारासाठी तातडीने पंचतारांकित रुग्णालयांमध्ये दाखल केले जाते, हा नेहमीचा अनुभव आहे. नर्मदा आक्का किंवा स्टॅन स्वामी ही चर्चेत असलेली व्यक्तिमत्त्वे! ते तुरुंगात असताना बाहेर त्यांचा आवाज बुलंद करण्यासाठी त्यांच्या संस्था, संघटना तरी असतात; पण देशभरातील शेकडो तुरुंगांमध्ये असे हजारो लोक वर्षानुवर्षांपासून खितपत पडलेले आहेत, ज्यांच्या पाठीशी ना कोणत्या संस्था-संघटना आहेत, ना त्यांच्या कुटुंबीयांपाशी न्यायालयांमध्ये लढा देण्यासाठी लागणारा पैसा आहे! केवळ जामिनासाठी भरावयाच्या रकमेची ऐपत नसल्यामुळे, जामीन मिळण्यासाठी पात्र असूनही, अनेकजण वर्षानुवर्षांपासून तुरुंगात खितपत पडले आहेत. स्वस्थ समाजासाठी तुरुंग ही व्यवस्था आवश्यक आहेच; परंतु तुरुंग अपराध्यांना निरपराधांपासून विलग ठेवण्यासाठी असतात, निरपराधांना अपराध्यांच्या संगतीत ढकलण्यासाठी किंवा कैद्यांचा जीव घेण्यासाठी नसतात! किमान ही मूलभूत गोष्ट तरी शासन व प्रशासनाने ध्यानात ठेवली पाहिजे.

## खाखरा वि. पराठा

वस्तू व सेवा कर परिषदे'ची (जीएसटी कौन्सिल) ४५वी बैठक येत्या आठवड्यात भरत असताना करदात्यांस करवसुली यंत्रणेविरोधात थेट अर्थ मंत्रालयाकडे धाव घ्यावी लागली हे या कराच्या अनेक अपयशांतील एक. या कर परिषदेची बैठक येत्या शुक्रवारी लखनऊ येथे भरेल. या बैठकीसाठी लखनऊ या देशातील व्यापारउदिमातील अत्यंत महत्त्वाच्या शहराची निवड करण्यामागे त्या राज्यात होऊ घातलेल्या निवडणुका आहेत असे मानण्याचे कारण नाही. तसेच गुजरात निवडणुकांच्या तोंडावर खाखरा हा उठवळ खाद्यपदार्थ जणू भारताचे राष्ट्रीय खाद्यान्न आहे असे समजून त्यास वस्तू/सेवा करात मोठी सवलत देण्यात आली होती, तसे काही उत्तर प्रदेश निवडणुकांच्या तोंडावर करण्याचा सरकारचा मानस आहे असाही संशय घेण्याचे कारण नाही. तेव्हा हे दोन संशय वगळून या बैठकीच्या पार्श्वभूमी चा विचार व्हायला हवा.

यातील पहिला मुद्दा आहे तो वस्तू/सेवा कर भरावा लागतो त्या करदात्यांचा. या करदात्यांनी आपल्या संघटनेमार्फत गेल्या आठवड्यात सरकारकडे आपले गाऱ्हाणे मांडले. ते होते वसुलीच्या तगाद्याबाबत. वस्तू/सेवा कराची वसुली दरमहा किमान एक लाख कोटी रु. असायला हवी या दडपणामुळे संबंधित खात्याचे अधिकारी अरेरावी करीत असल्याची या करदात्यांची तक्रार आहे. या अधिकाऱ्यांवर लाखाची उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी 'वरून' दबाव आहे आणि त्यामुळे ते आमच्यावर नाना प्रकारे दडपण आणत आहेत, असे या करदात्यांचे म्हणणे. ते अवास्तव आहे असे मानण्याचे अजिबात कारण नाही. कारण 'आम्ही करदहशतवाद करणार नाही', असे म्हणत प्रत्येक सरकार या ना त्या प्रकारे अन्याय्य करवसुली करण्याचा प्रयत्न करीत असते. विद्यमान सरकार त्यास अजिबात अपवाद नाही. पूर्वलक्ष्यी प्रभावाने कर आकारणी हा करदहशतवादाचा उत्तम नमुना. तो दूर करण्यास विद्यमान सरकारला सात वर्षे लागली. त्यामुळे वस्तू/सेवा कराच्या वसुलीबाबत असेच काही होत असणार हे धक्कादायक नाही. वस्तू/सेवा करवसुली





अधिकाऱ्यांकडून अनेकांना नोटिसांवर नोटिसा पाठवल्या जात असून प्रत्यक्ष जबाब/खुलासा नोंदवण्यासाठी संबंधितांस कार्यालयात हजर राहण्यासाठी तगादा लावला जात आहे. यामागे दुसरे तिसरे काहीही कारण नसून हा केवळ अधिक महसुलाच्या दडपणामुळे आमच्यावर दबाव आणण्याचा भाग आहे अशी तक्रार या करदात्यांच्या वतीने 'केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळा'कडे करण्यात आल्याचे वृत्त आहे. हा झाला या बैठकीच्या पार्श्वभूमी चा एक भाग.त्याखेरीज या बैठकीत अनेक महत्त्वाचे मुद्दे धसास लागण्याची शक्यता असून त्यात राज्यांस नुकसानभरपाईपोटी २०२२ च्या पुढे मुदतवाढ देण्याबाबत एक निर्णय असणे अपेक्षित आहे. केंद्र आणि राज्य संबंधांबाबत हा एक कळीचा मुद्दा. वस्तू व सेवा कर अंमलबजावणीच्या सुरुवातीपासून केंद्र सरकार राज्यांस पाच वर्षे नुकसानभरपाई देण्यास बांधील आहे. म्हणजे यानुसार सर्व राज्यांना २०२२ पर्यंत कर महसुलातील तुटीची भरपाई मिळेल. पण सुरुवातीपासूनच या करउत्पन्नाबाबत केंद्र सरकारचे ठणठणगोपाळ असल्याने राज्यांस अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही. म्हणून विविध राज्ये आता ही पाच वर्षांची मुदत वाढवण्याची मागणी करतात. त्यानुसार तशी ती वाढवण्यात अडचण अशी की असा निर्णय घेण्याचा अधिकार सरकारलाही नाही. म्हणजे तो घ्यायचा झाल्यास घटनादुरुस्ती करणे आले. तशी शक्यता अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २८ मे रोजी झालेल्या बैठकीनंतर व्यक्त केलेली आहेच. त्यासाठी प्रसंगी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याचीही सरकारची तयारी आहे. पण सरकारी अनुभव लक्षात घेता ती केवळ शब्दसेवाच ठरण्याची शक्यता अधिक. तसेच वस्तू/सेवा कर २०१७ साली अमलात आला त्या वेळी आणखी दोन महत्त्वाचे निर्णय घेतले गेले. एक म्हणजे दर दोन महिन्यांनी राज्यांना कराचा परतावा दिला जाईल आणि दर तीन महिन्यांनी वस्तू/सेवा परिषदेची बैठक घेतली जाईल. या दोन्ही नियमांची पायमल्ली केंद्रानेच केली. याबाबत तमिळनाडू, प. बंगाल आदी राज्यांनी पुरेशी ओरड केलेली आहे, तिची सावली या बैठकीवर असणे अपरिहार्य. या प्रशासकीय मुद्द्यांखेरीज दाट शक्यता आहे ती पोलाद भंगारावरील वस्तू/सेवा कराचा विद्यमान दर १८ टक्क्यांवरून पाच टक्क्यांवर आणला जाईल, अशी. याबाबत विविध राज्य सरकारांनी मागणी केली असून त्यात भाजपशासित हिमाचल प्रदेशचाही समावेश आहे. अलीकडच्या काळात रस्ते वाहतूक खात्याचे मंत्री नितीन गडकरी यांच्यासकट अनेकांनी पोलाद उत्पादकांच्या कथित गटबाजीविरोधात टीकास्त्र सोडले. त्याच्या मुळाशी हा १८ टक्के दर हे कारण आहे. त्यानंतर अलीकडच्या काळात पोलाद व्यापारातील अनेकांवर सक्तवसुली संचालनालय आदींनी कारवाया केल्या. त्यांचे म्हणणे असे की हे पोलाद व्यावसायिक 'इनपुट क्रेडिट' मिळवण्यासाठी बनावट कागदपत्रे सादर करतात. यासाठी पोलाद भंगार विक्रेते खोट्या पुरवठादारांची एक मालिकाच तयार करतात आणि अनेक राज्यांत हे व्यवहार नोंदवून 'इनपुट क्रेडिट' मिळवतात. अशा गुंतागुंतीच्या साखळीद्वारे पोलाद उत्पादकास एकदा का भंगार पुरवले गेले की या साखळीचा उद्गाता गायब होतो. वस्तू/सेवा कर अधिकाऱ्यांस जाग येऊन त्यांनी प्रत्यक्ष व्यवहार तपासण्यास सुरुवात करेपर्यंत उशीर झालेला असतो आणि त्यामुळे कारवाईचा बडगा पोलाद उत्पादकास सहन करावा लागतो. याबाबत अनेकांनी वास्तव निदर्शनास आणून दिल्यानंतर अर्थ मंत्रालयास त्याची जाणीव झालेली दिसते. हे सर्व होते ते पोलाद भंगार व्यवहार हे १८ टक्के इतक्या मोठ्या करचौकटीत असल्यामुळे. जितका कर अधिक तितकी तो चुकवला जाण्याची शक्यता अधिक. त्यामुळे हा पोलाद भंगार व्यवहार आता पाच टक्के करचौकटीत आणला जाईल असा अंदाज आहे. लखनऊ येथील बैठकीत त्यावर निर्णय होण्याची शक्यता आहे. वास्तविक अत्यंत हास्यास्पद, अतिरंजित कर आकारणी हे आपल्या वस्तू/सेवा कराचे एकूणच वैशिष्ट्य म्हणावे लागेल. या कराच्या अंमलबजावणीपासून आजतागायत याचे अनेक नमुने समोर आले. त्यापैकी ताजे उदाहरण म्हणजे पराठा या खाद्यप्रकारावर किती कर आकारला जावा, याबाबत वस्तू/सेवा कराच्या गुजरात राज्य प्राधिकरणाने दिलेला ताजा निर्णय. विषय होता वाडीलाल उद्योगसमूहाने याबाबत केलेला अर्ज. आपल्या सेवनसिद्ध (रेडी टु ईट) पराठा या उत्पादनास तशाच सेवनसिद्ध खाखरा वा पोळी/चपातीप्रमाणे पाच टक्के इतकाच कर आकारला जावा, अशी या कंपनीची मागणी. त्या पुष्ट्यर्थ कंपनीने अनेक शब्दकोशांचा आधार घेत 'पराठा' म्हणजे काय हे प्राधिकरणास समजावण्याचा प्रयत्न केला. पण प्राधिकरणाने कंपनीचे काही ऐकले नाही आणि पराठ्यावर १८ टक्के कर आकारण्याचा निर्णय दिला. प्राधिकरणाचे म्हणणे असे की सेवनसिद्ध खाखरा वा पोळी/चपाती थेट खाण्याची सोय आहे. पराठ्याचे मात्र तसे नाही. त्यावर प्रक्रिया केल्याखेरीज तो खाता येत नाही. म्हणून त्यावर खाखऱ्याइतकी पाच टक्के इतकी कमी आकारणी अयोग्य. वास्तविक असे कोणतेही करवाद तयार होऊ नयेत याच उद्देशाने वस्तू/सेवा कर निर्मिला गेला. पण झाले उलटेच. अत्यंत सदोष नियोजनामुळे हा कर सव्यंग जन्मला आणि त्यानंतर त्यात डझनांनी सुधारणा केल्या गेल्या. ही प्रक्रिया अजूनही अपूर्णच आहे हे खाखरा विरुद्ध पराठा या वादातून दिसून येते. अशा वेळी या कराची संपूर्ण फेररचना अपरिहार्य ठरते. आपली वाटचाल त्या दिशेने सुरू आहे.

# साकीनाका प्रकरणी तपासात कुठलाही हलगर्जीपणा नसल्याबद्दल राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे समाधान

## मुख्यमंत्र्यांनी स्वत: आयोगाच्या उपाध्यक्षांना बोलविले चर्चेस



मुंबई दि. 13 : साकीनाका येथे महिलेवरील बलात्कार आणि त्यानंतर तिच्या झालेल्या मृत्यू प्रकरणी एकूणच पोलिसांनी त्वरेने सुरु केलेल्या तपासावर राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने समाधान व्यक्त केले आहे. राज्यशासन याप्रकरणी संपूर्ण न्याय देईल असा विश्वास व्यक्त करताना आयोगाचे उपाध्यक्ष अरुण हलदार यांनी या घटनेत राजकारण आणता कामा नये असे देखील स्पष्ट केले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे उपाध्यक्ष अरुण हलदार यांना या घटनेच्या अनुषंगाने स्वत: चर्चेसाठी बोलावून या घटनेकडे राज्यशासन गांभिर्याने पहात असून पिडीतेच्या कुटूंबास योग्य तो मोबदला देण्यात येईल व तिच्या मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी देखील पार पाडण्यात येईल, असे आयोगास सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, मुख्य सचिव सिताराम कुंटे, पोलीस महासंचालक संजय पांडे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, सामाजिक न्याय विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव अरविंद कुमार, महिला बाल कल्याण विभागाच्या सचिव आय. एस. कुंदन, पोलीस आयुक्त हेमंत नगराळे, सह पोलीस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील, मिलिंद भारंबे आदिंची उपस्थिती होती.

पिडीत महिलेच्या कुटूंबास तातडीने आर्थिक सहाय्य मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले, पिडीत महिलेच्या मुलांना, परिवारास महिला बाल कल्याण विभागाच्या मनोधैर्य योजनेतून तसेच सामाजिक न्याय विभागाच्या अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये आर्थिक सहाय्य तातडीने दिले जाईल. या महिलेच्या मुलांच्या शिक्षण व पालन-पोषणाच्या बाबतीतही संबंधित विभागांना वेगाने कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचे आयोगाच्या उपाध्यक्षांना सांगितले. अनाथ, निराश्रित महिलांसाठी घरांबाबत विचार मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले, ज्या निराश्रित व अनाथ महिला रस्त्यांवर राहतात त्यांच्यासाठी राज्य सरकार व केंद्र सरकार मिळून घरकूल योजना सुरू करता येते का यासंदर्भात विचार करता येवू शकतो. यासंदर्भात आयोगाने अशा स्वरुपाची योजना आखण्याविषयी केंद्र शासनास सूचना करावी असेही मुख्यमंत्री म्हणाले. तपासात हलगर्जीपणा नसल्याबद्दल समाधान राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे उपाध्यक्ष अरुण हलदार यांनी, ही घटना घडताच अवघ्या काही वेळात पोलिसांनी धाव घेतली व



महिलेस मदत केली. त्याचप्रमाणे पुढे देखील वेगाने तपास करुन आरोपीस अटक केली याविषयी समाधान व्यक्त केले. पोलिसांना धन्यवाद देवून ते म्हणाले, पिडीत महिलांना आपण न्याय देवू शकतो हे दाखविण्यासाठी प्रशासनाने चांगली पावले उचलली आहेत. आता लवकरात लवकर खटला जलदगती न्यायालयात उभा करुन गुन्हेगारास फाशीची शिक्षा द्यावी जेणेकरुन गुन्हेगारांना धाक राहील. पोलीस आयुक्त हेमंत नगराळे म्हणाले, ही घटना कळता क्षणी दहा मिनिटात पोलीस घटनास्थळी पोहचले, एवढेच नाही तर जखमी अवस्थेत पडलेल्या महिलेस स्वत: टेम्पो चालवत पोलीसांनी तिला रुग्णालयात पोहोचवले. राजा ठाकरे यांची तातडीने नियुक्ती मुख्यमंत्री श्री.ठाकरे यांनी तातडीने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेवून विशेष सरकारी अभियोक्ता यांची हा खटला न्यायालयात उभा राहण्याअगोदरच नियुक्ती करण्यात यावी असे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे प्रसिद्ध वकील राजा ठाकरे यांची तातडीने नियुक्ती करण्यात आल्याची माहिती देखील यावेळी पोलीस आयुक्तांनी दिली, यावर आयोगाचे उपाध्यक्ष अरुण हलदार यांनी समाधान व्यक्त केले. सीसीटिव्ही कॅमेऱ्यांचे जाळे वाढवणार ही घटना सीसीटिव्ही कॅमेरामध्ये कैद झाली आहे. मुंबई शहरात 5 हजार सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून 7 हजार कॅमेरे बसविणे सुरु आहे अशी माहिती देवून सह पोलीस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील म्हणाले की, शहरातील सर्व मॉल्स, संस्था, दुकाने यांना रस्त्याच्या दिशेकडील कोनात कॅमेरे बसविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अशारीतीने शहरात सुमारे 50 हजारापेक्षा जास्त कॅमेरे कार्यरत आहेत अशी माहिती त्यांनी दिली.

## नालासोपारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत शरीरास हानिकारक असलेल्या गुटखा पानमसाला याचा मोठा साठा पकडला




नालासोपारा : दिनांक ११/०९/२०२१ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिति प्राप्त झाली की, नालासोपारा (पुर्व), आचोळे रोड येथील डॉन लेन मधील एका किराणा दुकानचालकाने त्याच्या किराणा दुकानात प्रतिबंधीत केलेला गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखु असा माल विक्रि करीता साठवणुक करुन ठेवलेला आहे.सदर मिळालेल्या बातमी वरिष्ठांना कळवून त्यांच्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे छापा कारवाई करण्यात आली. सदर कारवाई दरम्यान किराणा दुकानदार जुबेर अहमद मुशरफ हुसेन पटेल याच्या किराणा दुकानातून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला व मानवी जिवीतास अपायकारक असलेला गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखु असा ५१८४०/-रु. किंमतीचा मुद्देमाल तसेच स्वीटी हाउस वेल्फेयर सोसायटी या बिल्डींग मधील रुम.क्र. ००१ मधुन तसेच स्वीटी हाउस चाळी मधील रुम मधुन ६,२२,६३८/-रु. किंमतीचा असा एकुण ६,७४,४७८/-रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन जुबेर अहमद मुशरफ हुसेन पटेल व सदरचा माल विक्री करणारा ईसम नवाजीस उस्मान अन्सारी यांचे विरुध्द तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद दाखल करण्यात आला असुन नमुद २ आरोपींना गुन्हयात अटक करण्यात आली असून पुढील तपास चालु आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक, श्री. देवीदास हंडोरे, सपोनि. विलास कुटे, मसपोनि. तेजश्री शिंदे नेम-भरोसा सेल, पोना. पवन पाटील, पो.शि.ज्ञानेश्वर चव्हाण, पोशि. विष्णुदेव घरबुडे, तसेच सफौ. बी. डी. चित्ते, पो.हवा. बी. एम. पवार नेमणुक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा विभाग यांनी केली आहे.

## अंमलीपदार्थ विरोधी कक्षाची कामगिरी - गांजाची विक्री करणा-या 2 आरोपीना अटक करुन 4 किलो गांजा हस्तगत



भाईंदर : दिनांक ०९/०९/२०२१ रोजी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली की, भाईंदर (पुर्व), आरएनपी पार्क येथील डायमंड खुशाल बिल्डींग समोर एक ईसम त्याच्या राहत्या घरात गांजा नावाचा अंमली पदार्थ बाळगुन त्याची विक्री करतो.सदर मिळालेली बातमी श्री. रामचंद्र देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांना कळवुन डॉ. श्री. महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे छापा कारवाई करण्यात आली. सदर कारवाई दरम्यान आरोपी सिकंदर शब्बन खान वय ३५ वर्षे, रा.डायमंड खुशाल बिल्डींगचे समोरील झोपडीत, आरएनपी पार्क, एस.व्ही.रोड, भाईंदर (पुर्व) व मोहम्मद शहीद मोहम्मद मुख्तार शेख यांच्या जवळ एकुण ४ किलो २६ ग्रॅम वजनाचा व १,२०,६९०/-रु. किंमतीचा गांजा नावाचा अंमली पदार्थ मिळुन आला. सदर अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेला असुन नमुद दोन्ही आरोपींविरुध्द अंमली पदार्थ कायदया प्रमाणे नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास नवघर पोलीस पोलीस स्टेशन करित आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री. देवीदास हंडोरे, सहा.पोलीस निरीक्षक विलास कुटे, मसपोनि. तेजश्री शिंदे नेम-भरोसा सेल, पोना. पवन पाटील, पो.शि. ईश्वर पाटील, पोशि. विष्णुदेव घरबुडे यांनी केली आहे.

## जीवावर वर उदार होऊन वाचविले महिलेचे प्राण रेल्वे पोलीस हवालदार नाईक यांची कामगिरी



वसई : वसई रोड रेल्वे स्टेशन येथे दिनांक 11/09/2021 रोजी सुमारे 10.01 वाजता डहाणू ते अंधेरी जाणारी फास्ट लोकलच्या ट्रॅक वर एक महिला आली व उभी राहिली.सदरची घटना कर्तव्यवरील पोहवा नाईक यांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ धावत जाऊन ट्रेनच्या मोटर मनला इशारा करून लोकल ट्रेन थांबवण्यास सांगितले व स्वतः पोलीस हवालदार नाईक यांनी ट्रॅक मध्ये उडी मारून नमूद महीलेस ट्रॅकवरून बाजूला घेतले व तिचे प्राण वाचवले. नमूद महिलेकडे अधिक चौकशी केली असता तिचे वय 60 वर्षे राह. नालासोपारा तिच्या पतीचे निधन झाले असून व तिचा मुलगा पुणे येथे असल्याकारणाने वर नमूद ठिकाणी एकटी राहते. सदरची महिला तणावात असलेचे लक्षात आल्याने तिचे समुपदेशन करून तिला सुरक्षिततेसाठी मराठा फाउंडेशन वृद्धाश्रम, विरार येथे ठेवण्यात आले आहे. पोलीस हवालदार नाईक यांनी दाखवलेल्या कर्तव्यतत्परतेमुळे एका वृद्ध महिलेचे प्राण वाचले आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांनी पोलिसांचे आभार मानले .

## प्रवासादरम्यान गहाळ झालेल्या वस्तूचा शोध लावून ते सामान प्रवाशांस केले परत - मुंबई रेल्वे पोलीस ठाणे यांची चांगली कामगिरी



कल्याण : प्रणव अनंत बाडागळे राह कुर्ला . यांचा प्रवासा दरम्यानदोन रेडमी व इन्फिनिक्स कंपनी चे किंमत अंदाजे २५,७००/- रुपये मोबाईल हरवले होते त्याबद्दल त्यांनी तक्रार केली होती त्यानुसार कल्याण रेल्वे पोलीस ठाणे यांनी शोध घेऊन माननीय रेल्वे पोलिस आयुक्त सो. दिनांक ११/०९/२०२१ रोजी प्रणव बाडागळे यांस त्यांचा मुद्देमाल परत दिला आहे. त्याचप्रमाणे . दिनांक ११/०९/२०२१ रोजी अशोक वाळू दळवी राह. भिवंडी यांचा हरवलेला मोबाईल फोन किंमत अंदाजे १६,९९९/- रुपये त्यांना वरीष्ठ पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनानुसार सपोफौ कोळी, पोशि. दामेधर , मपोशि. जाधव, यांना परत दिला आहे त्याबद्दल त्यांनी कल्याण रेल्वे पोलिसांचे आभार मानले. चर्चगेट : दिनांक ११/०९/२०२१रोजी पोशि बडगुजर हे चर्चगेट रेल्वे स्टेशन येथे मपोहवा भालेराव, पोना खरतुडे पोशि मोहीते यांच्या बरोबर असताना १२.१८ वा चे दरम्यान फलाट क्रमांक ३ व ४ वर गस्त करीत असताना विरार फास्ट लोकल ट्रेन मध्ये दोन नंबर च्या कोच मध्ये एक नेव्ही ब्लू रंगाची बॅग मिळुन आली. बॅग मध्ये प्रवासी यांचा मोबाईल नंबर मिळून आल्याने प्रवासी यांना संपर्क साधला असता प्रवासी हिम्मतलाल शिवलाल शाह वय ५५ वर्ष राह. दहिसर पूर्व त्यांना चर्चगेट रेल्वे स्टेशन येथे बोलावून सदर ची बॅग ही त्यांचीच असल्याची खात्री करून व त्यामधे असलेले रोख रक्कम २०,०००/- रुपये असे ठाणे अंमलदार यांचे समक्ष ताब्यात दिले. प्रवाशांनी पोलिसांचे आभार व्यक्त केले आहेत. मुंबई सेंट्रल : दिनांक ११/०९/२०२१ अनिल भाडरे, यांना एक काळ्या रंगाची सॅंगबॅग लोकलमध्ये बेवारस मिळून आली त्यांनी त्यावेळी ती बॅग डयुटी वर असलेले सपोफौ बाईत मपोहवा,मपोशि यांना दिली . सदर बॅग तपासून पाहता त्यात काळ्या रंगाचे पाकीट त्यात SBI, AXIS, IDBI व पोष्टाचे डेबीट कार्ड इतर किरकोळ कागदपत्र मिळून आले. त्यावर महादेव पांडुरंग जाधव, राह. विरार असे मिळून आल्याने नमुद प्रवाशास संपर्क करुन बोलावून घेऊन खात्री नमुद सॅंगबॅग आतील सामानांसह व महत्वाचे कागदपत्रांसह त्यांच्या ताब्यात दिली. त्यांनी पोलीसांचे आभार मानले आहेत.

## वडाळा रेल्वे पोलीस ठाणे यांनी 24 तासात आरोपीस केली अटक.



वडाळा: वडाळा रेल्वे पोलिस स्टेशन हद्दीत दिनांक ०९/०९/२०२१ रोजी रात्री ११. ०० वाजता महिला प्रवाशी ह्या किंग्ज सर्कल रेल्वे स्थानक येथे लोकल गाडीची वाट पहात स्टेशन बाकड्यावर बसून मोबाइल फोन मध्ये व्यस्त असताना एका अनोळखी इसमाने त्यांच्या हातातील मोबाईल फोन जबरदस्तीने खेचून ट्रॅक मध्ये उडी मारून पळून गेला अशी तक्रार केली असता सदर अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपसात सीसीटव्ही फुटेज व गुप्त बातमिदाराच्या मदतीने यातील नमूद आरोपी हा बंगालीपुरा, वडाळा या परिसरात असल्याची माहिती मिळाल्याने तपासपथकाने योग्य त्या रीतीने सापळा रचून आरोपी मोहम्मद मोसब्बर बोगदर शेख. वय २० वर्षे राह वडाळा, यांस ताब्यात घेतले त्याला पोलीस ठाण्यात आणून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून १८,४९९/- रू किमतीचा एक रेड मी कंपनीचा मोबाईल फोन फोन मिळून आला. सदरचा गुन्हा हा वर नमूद आरोपीने केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला त्यास त्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. सदरची कामगिरी तपास पथकाचे सपोनि श्री चव्हाण, पोहवा ऐवळे, पोना वर्पे, शेख, पोशि जगदाळे, सानप, कांबळे, रणनवरे. यांनी पार पाडली.

## महिला आमदाराच्या घरातून पाच लाखांची चोरी, तपास केला असता घरातलेच निघाले चोर



पाटणा - बिहारमधील नवादा विधानसभा मतदार संघातील आमदार विभा देवी यांच्या घरामधून पाच लाख रुपयांची रोख रक्कम लांबवण्यात आल्याची घटना समोर आली आहे. पथरा इंग्लिश गावातील आमदारांच्या घरात हा चोरीचा प्रकार घडला. दरम्यान, हे प्रकरण सुमारे दहा दिवसांपूर्वीचे असल्याचे सांगण्यात येत आहे. घरामध्ये ठेवलेल्या पैशांची गरज पडल्यावर आमदारांनी पैसे ठेवलेल्या जागी शोध घेतला असता सदर पैसे सापडले नाहीत, त्यामुळे चोरीची ही घटना समोर आली. दरम्यान, या प्रकरणात संशयाची सुई घरातीलच काही नातेवाईकांवर वळली. या प्रकरणी राजदच्या आमदारांचे प्रतिनिधी राकेश कुमार यांनी मुफस्सिल पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली. मात्र कौटुंबिक प्रकरण असल्याने या प्रकाराची जास्त चर्चा न करता ते मिटवण्यात आले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार दोन नातेवाईक आमदारांच्या घरी राहत होते. त्याशिवाय घरात अन्य कुणीही नव्हता. त्यामुळे चोरीच्या घटनेनंतर संशयाची सुई नातेवाईकांकडेच वळली.आता आमदारांच्या प्रतिनिधिने या दोघांविरोधात तक्रार दाखल केली आहे. तक्रार दाखल होताच मुफ्फसिल पोलीस ठाण्याने या प्रकरणाची चौकशी सुरू केली. याबाबत पोलीस अधिकारी लाल बिहारी पासवान यांनी सांगितले की, या प्रकरणात घरातील तीन नोकरांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून एकूण ३३ हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत. कसून चौकशी केली असता त्यांनी या प्रकरणात अजून एका नोकराचा सहभाग असल्याचे मान्य केले. मात्र हा नोकर सध्या फरार आहे. त्याचा शोध पोलीस घेत आहेत. दरम्यान, अटक करण्यात आलेल्या तिन्ही नोकरांची रवानगी तुरुंगात करण्यात आली आहे.

## धक्कादायक! सणासुदीच्या काळात चैन स्नॅचिंगची वाढली भीती



मीरारोड - सध्या गणेशोत्सवाची धामधूम सुरू असून महिलांनी काळजी घेतली नाही तर सण चोरट्यांसाठी सुगीचा ठरणार आहे. मीरा भाईंदरमध्ये चेन स्नेचर सक्रिय असून दोन घटनांमध्ये दोन महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने खेचून चोरट्यांनी पळ काढला आहे. मीरारोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत शीतल नगर, एमटीएनल मार्गावरील डिसीबी बँकेजवळ बेबीकुमारी पाटकर (४२) यांच्या गळयातील ४४ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र वेगाने दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी हिसकावून नेले. त्या आधी काशीमीरा येथील संत एन्स रुग्णालयाच्या समोर बस स्थानक येथे आशादेवी कुंभार यांच्या गळयातील १६ ग्रॅम वजनाची सोनसाखळी मारून दुचाकी स्वाराने पोबारा केला. आशादेवी पतीसह ठाण्याला जाण्यासाठी सकाळी थांबल्या असता दुचाकी बिघडल्याचे कारण सांगून चोरट्याने डाव साधला. या आधी नवघर पोलीस ठाण्यात सुद्धा चेन स्नॅचिंगच्या दोन घटना घडल्या आहेत.

## रस्त्यांची दुरावस्था पोलिसांना बघवेना! भिवंडीत वाहतूक पोलिसांनी बुजवले

भिवंडी - भिवंडीतील रस्त्यांची दुरावस्था झाली असून तेथील सर्वच रस्त्यांवर खड्डयांचे साम्राज्य पसरले आहे. रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहन चालकांसह नागरिकांचे मोठे हाल होत आहेत.

त्यातच खड्ड्यांमुळे रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. या वाहतूक कोंडीमुळे नागरिक हैराण होत असून या वाहतूक कोंडीचा त्रास येथील वाहतूक पोलिसांनी देखील होत असल्याने वाहतूक पोलिसांनी स्वतःच रस्त्यावरील खड्डे रविवारी भरले. वाहतूक सुरळीत ठेवणाऱ्या वाहतूक पोलिसांवरच आता रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे वेळ आल्याने भिवंडी मनपा प्रशासनाचा हलगर्जी कारभार चव्हाट्यावर आला आहे. पावसाळा सुरू होताच शहरातील महामार्गावरील खड्डे पडतात. सर्वच राजकीय पक्षातील नेत्यांसह प्रतिनिधी रस्त्यावर उतरून खड्ड्यांवरून राजकारण करताना दिसून येतात. विशेष म्हणजे ज्या दिवशी आंदोलन किंवा राजकीय नेत्यांच्या दौरा असेल त्या दिवशी सार्वजनिक बांधकाम विभाग व मनपा प्रशासन विभागाचे संबंधित अधिकारी अथवा ठेकेदार खड्डे बुजवण्याचे आश्वासन देतात. मात्र रस्त्यांवर खड्यांचे साम्राज्य जैसे थे असल्याचे दिसून येत असल्याने वाहतूक पोलिसांना या खड्ड्यांमुळे त्रास होत असल्याने वाहतूक पोलिसांनीच भिवंडी शहरातील विविध मार्गावरील



खड्डे भरण्याचे काम वाहतूक पोलिसांनी सुरू केले आहे. भिवंडी वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मायने यांच्या म्हणण्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग रस्ते विकास महामंडळ एमएमआरडीए तसेच रस्त्या संदर्भात असलेल्या विभागांना पत्रव्यवहार करून गणपतीपूर्वी खड्डे बुजवण्याचे लेखी पत्र दिले होते. मात्र त्यावर सर्वच शासकीय यंत्रणांचे दुर्लक्ष केल्याने सामाजिक बांधिलकी म्हणून वाहतूक पोलिसांनी भिवंडीतील विविध मार्गावरील पडलेले खड्डे बुजवण्याचे काम सुरू केले आहे. मुंबई नाशिक महामार्ग तसेच ठाणे ते भिवंडी , कशेळी ते अंजुर फाटा व मानकोली ते चिंचोटी - कामन रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी होत असते. शिवाय वाहनांचे अपघात व नुकसान देखील खड्ड्यांमुळे होत असल्याने याला सर्वस्वी जबाबदार वाहतूक पोलिसांना नागरिक ठरवतात. त्यामुळे प्रशासनाला वारंवार विनंती करूनही रस्त्यांवरील खड्डे बुजवत नसल्याने वाहतूक पोलिसांना रस्त्यावर उतरून खड्डे बुजवण्याची वेळ आली आहे. पोलिसांनी वाहतूक कोंडी सोडवावी की, रस्त्यांवरील खड्डे बुजवावे असा प्रश्न उपस्थित झाला आहे. पंधरा दिवसापूर्वी मनसैनिकांनी खड्ड्यांच्या विषयावरून मालोडी टोलनाका फोडला होता. तसेच पडघा टोल नाका व कशेळी टोल नाका या दोन्ही टोल नाक्यांवर आंदोलन करून टोलवसुली बंद करण्याचा इशारा दिला. त्यानंतर जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनीही रस्त्यांवरील खड्याच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत पाहणी दौरा केला होता.

शिवाय खासदार कपिल पाटील यांची केंद्रीय मंत्री मंडळात वर्णी लागल्यानंतर जनआशीर्वाद यात्रा भिवंडी शहर तसेच ग्रामीण भागातील विविध मार्गावरून काढण्यात आली. त्यावेळेस तात्पुरते खड्डे बुजवण्यात आले होते. मात्र त्याही रस्त्यांवर खड्ड्यांनी डोके वर काढले आहेत. त्यामुळेच वाहतूक पोलिसांवर खड्डे भरण्याची वेळ आली आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898